PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dharal Tar Chavatay
Year: 1989

Song: Rimzim Dhara Ni Wadal Wara
Lyricist: Pravin Davane

रिमझिम धारा नि वादळ वारा
रिमझिम धारा नि वादळ वारा
ही ठिणगी उरात फुलतयं रे
घसरेल पाऊल धोक्याची चाहूल
धडकी मनात भरतयं रे
हो भिऊ नको मनात
भिऊ नको मनात
पावसाच्या फुलात
वेल अशी थरथरते गं
सावरून तुला मी
आधार दिला
ढगात बिजली फसते गं
रिमझिम धारा नि वादळ वारा
हाय रिमझिम धारा नि वादळ वारा
सोळा सतरा पावसाळे
आले नि गेले
ऋतू रंग प्रणयाचे
ऊरी जागले
हो माझ्या आधी वादळाने
तुला वेढले
नाते दोन हृदयांचे
आज जोडले
झिममिर पाण्यात
झुळझुळ मनात
आहा झिममिर पाण्यात
झुळझुळ मनात
तन मन फुलून भिजतयं रे

घसरेल पाऊल धोक्याची चाहूल
धडकी मनात भरतयं रे
हा रिमझिम धारा नि वादळ वारा
हे रिमझिम धारा नि वादळ वारा
इंद्रधनु वाटेवरी
सूर जागला
मिलनात सावल्या या
चिबं न्हाहल्या
हो दिशा मोरपंखापरी
फुलूनी गेल्या
गीत नव्या श्रावणाचे
घेऊनी आल्या
लखलख नभात
धडधड मनात
होय लखलख नभात
धडधड मनात
मनासारखं घडतयं गं
घसरेल पाऊल धोक्याची चाहूल
धडकी मनात भरतयं रे
हे रिमझिम धारा नि वादळ वारा
रिमझिम धारा नि वादळ वारा
ही ठिणगी उरात फुलतयं रे
घसरेल पाऊल धोक्याची चाहूल
धडकी मनात भरतयं रे
रिमझिम धारा नि वादळ वारा
रिमझिम धारा नि वादळ वारा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*